1. अपिलार्थी यांची सर्व 43 द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा जालना, यांचे मार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनिस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरुन सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

सत्यमेव जयते

खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./9551/ 2024/ 6156 दि. 16/6/2025

प्रत, माहितीसाठी तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ४४ | द्वितीय अपील क्रं. १९९५/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुर्यकांत पंडितराव जाधव<br>रा. माळकिनी ता. मंठा जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,<br>ग्राम पंचायत माळकिनी ता. मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक १५.३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०७.९.२०२३ | ग्रा पं अंतर्गत विविध विकास कामाची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली संपुर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१९९५/२०२४ 6099 दि. 16/6/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ४५ | द्वितीय अपील क्रं. ४७६०/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भगवान गणेश हिवाळे,<br>रा. मु. पो. रामतिर्थ ता. मंठा जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,<br>ग्राम पंचायत रामतिर्थ ता. मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०८.१.२०२४ | सन २०२१ ते २०२२-२३ पंधरावा वित्त आयोग सविस्तर माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे माहिती व प्रथम अपिल अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कोणतीही कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत. याबाबीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना अनुक्रमे कलम ७(१) व कलम १९(६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मोठया कालावधीची व विस्तृत स्वरुपाची

माहिती मागविलेली असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहितीचे अधिनियमाचे कलम २(J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत रामतिर्थ ता. मंठा जि. जालना यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे.अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत रामतिर्थ ता. मंठा जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, मंठा जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर विहीत मुदतीत अपेक्षित कार्यवाही केलेली नसल्याने अधिनियमातील कलम १९(६) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द गट विकास अधिकारी पंचायत समिती, मंठा जि. जालना यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६,दि.३१.०३.२००८ नुसार कार्यवाही अनुसरावी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंठा जि. जालना यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

५. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रकाश..

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४७६०/२०२४ 6100 दि. 16/6/2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

गट विकास अधिकारी पंचायत समिती, मंठा जि. जालना

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ४६ | द्वितीय अपील क्रं. ४७७१/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सिध्दार्थ बाबाराव इंगळे,<br>रा. पाटोदा ता. मंठा जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,<br>ग्राम पंचायत, पाटोदा ता. मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५)

अपिलार्थी यांनी दिनांक ०७.५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १७.१.२०२४ | सन २०१८-१९ मध्ये रमाई अंतर्गत प्रसाद निकाळजे यांच्या प्रस्तावाची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपिलाची सुनावणी घेतलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी पंचायत समिती कार्यालय, मंठा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर केलेला असून माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती पंचायत समिती स्तरावरील आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे माहिती व प्रथम अपिल अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कोणतीही कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत. याबाबीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना अनुक्रमे कलम ७(१) व कलम १९(६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी पंचायत समिती कार्यालय, मंठा जि. जालना यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मंठा जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी, पंचायत समिती, मंठा जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर विहीत मुदतीत अपेक्षित कार्यवाही केलेली नसल्याने अधिनियमातील कलम १९(६) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६,दिनांक ३१.०३.२००८ नुसार कार्यवाही अनुसरावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

५. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सत्यमेव जयते ... खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४७७१/२०२४ 610 दि. 16/6/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना
२. गट विकास अधिकारी पंचायत समिती, मंठा जि. जालना

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४७ | द्वितीय अपील क्रं. ४८३६/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बालासाहेब जनार्दनराव वरखडे<br>रा. लक्ष्मीकांतनगर घर नं. ८१ अंबड रोड, जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,<br>पंचायत समिती, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०८.५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३.३.२०२४ | श्री. बी. जे. वरखडे विस्तार अधिकारी सां. यांचे नियमित देयकाच्या रक्कमेतुन कपात झालेल्या संपूर्ण रक्कमेचा तपशील |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना कार्यालयात उपलब्ध असलेली संपुर्ण माहिती दिनांक २८.५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४८३६/२०२४ 6/02 दि. 16/6/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४८ व ४९ | द्वितीय अपील क्रं. ५४६४ व ५४६३/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भुरा रावसू पवार<br>रा. खोराड सावंगी ता. मंठा जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक २१.५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने श्री. व्ही. बी. पाटील विस्तार अधिकारी पं. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०४.३.२०२४ | मौ. खोराड सावंगी येथील ग्राम पंचायत मधील माहिती मिळणे बाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विस्तार अधिकारी पंचायत यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे माहिती व प्रथम अपिल अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कोणतीही कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत. याबाबीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना अनुक्रमे कलम ७(१) व कलम १९(६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली

असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहितीचे अधिनियमाचे कलम २(J)मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी पंचायत समिती कार्यालय, मंठा जि. जालना यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मंठा जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी, पंचायत समिती, मंठा जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर विहीत मुदतीत अपेक्षित कार्यवाही केलेली नसल्याने अधिनियमातील कलम १९(६) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्रं. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१.०३.२००८ नुसार कार्यवाही अनुसरावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

५. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./५४६४ व ५४६३/२०२४6/03 दि. 16/6/2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ५० | द्वितीय अपील क्रं. ८९४६/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. ज्ञानदेव दत्तात्रय काकडे<br>रा. जयपुर ता. मंठा जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,<br>पंचायत समिती, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २७.६.२०२४ | आपल्या कार्यालयाच्या भिंतीवर लावलेल्या वृत्तपत्राच्या कात्रणा विषयी सविस्तर अहवाल |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तीवादावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८९४६/२०२४ 6105 दि. 16/6/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५१ | द्वितीय अपील क्रं. ८९४८/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. ज्ञानदेव दत्तात्रय काकडे<br>रा. जयपुर ता. मंठा जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती, मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने श्री. आर. बी. गडदे कनिष्ठ प्रशासन अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २५.६.२०२४ | ग्रा. पं. जयपूर येथे म.ग्रा. ते. ह. या अंतर्गत तक्रारीवर केलेल्या प्रत्यक्ष पाहणी चौकशीचा अहवाल |

आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र यासंदर्भात अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे माहिती व प्रथम अपिल अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कोणतीही कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत. याबाबीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना अनुक्रमे कलम ७(१) व कलम १९(६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी ,पंचायत समिती, मंठा जि. जालना यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८९४८/२०२४ 6105 दि. 16/6/2025
<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५२ | द्वितीय अपील क्रं. ९६९३/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दिलीप कचरुबा हिवाळे,<br>ता. अध्यक्ष पॅंथर्स रिपब्लिकन पार्टी ता. मंठा जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्राम पंचायत किर्तापुर ता. मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत<br>पंचायत समिती मंठा जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १३.८.२०२४ | मौ. किर्तापूर ता. मंठा अंतर्गत कोणकोणती विकास कामे केली |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असून अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याबदल तसेच कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी निवेदन दि. २४.१.२०२५ रोजी कार्यालयात दिलेले असल्याचे अपील निकाली काढण्याची विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेले कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./९६९३/२०२४ 6106 दि. 16/6/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,<br>बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५३ ते ५६ व ५८ | द्वितीय अपील क्रं. २६६, २६७, २६८, २७० व १०५२२/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वामन एकनाथ उगले,<br>रा. प्रगती चाळ नं. २ रुम नं. ४ घर नं. ८६८६ सावंत पार्कच्या पाठीमागे खदानजवळ, महालक्ष्मीनगर, अंबरनाथ पुर्व जि. ठाणे | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन सेवली ता. जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, परतूर जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०५ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रं. | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| २६६/२०२४ | ०४.९.२०२३ | दि. २९.८.२०२३ रोजी ९ ते १२ भगवान उगले यांनी दिलेल्या तक्रारीची प्रत इत्यादी |
| २६७/२०२४ | ०४.९.२०२३ | दि. २५.८.२०२३ पासुन दि. ३१.८.२०२३ पर्यंतच्या स्टेशन डायरीच्या नकला मिळणे बाबत |
| २६८/२०२४ | ०५.९.२०२३ | पोलीस अधीक्षक जालना पत्र दि. १०.६.२०२३ पो. स्टे. सेवली येथे पाठविलेल्या तक्रारीची माहिती इत्यादी |
| २७०/२०२४ | ०६.९.२०२३ | दि. १.८.२०१९ पासून आजपर्यंतच्या सेवली पोलीस ठाणे मधील दप्तर, समन्स, वॉरंट नोंद रजिस्टर इत्यादी |
| १०५२२/२०२४ | २०.७.२०२४ | तहसिल कार्यालय जालना यांच्या मार्फत पोलीस स्टेशन सेवली यांना पुढील कारवाई साठी प्राप्त एकुण सर्व पत्राच्या प्रती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी एका प्रकरणात माहिती नाकारलेली असुन उर्वरित प्रकरणात अपुर्ण व दिशाभुल करणारी माहिती दिलेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द दंडात्मक कारवाई करुन नुकसान भरपाई देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपील क्रं. २७०/२०२४ मध्ये अपिलार्थी यांना माहिती नाकारण्यात आली असुन उर्वरित अपीला मध्ये अपिलार्थी यांना स्पीड पोस्टाद्वारे माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.१२.२०२३, दि. ०९.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात आजरोजी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगा समोर केलेला युक्तीवाद,सादर केलेले कागदपत्रे व दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. १८.१२.२०२३, दि. ०९.१०.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०५ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२६६/२०२४ 6107 दि. 16/6/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५७ | द्वितीय अपील क्रं. २७२/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वामन एकनाथ उगले,<br>रा. प्रगती चाळ नं. २ रुम नं. ४ घर नं. ८६८६ सावंत पार्कच्या पाठीमागे खदानजवळ, महालक्ष्मीनगर, अंबरनाथ पुर्व जि. ठाणे | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन सेवली ता. जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, परतूर जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०४.९.२०२३ | पोलीस ठाणे सेवली येथील मुख्यद्वार व पोलीस अंमलदार यांचया कक्षातील सी. सी. टी. व्ही. फुटेज |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती टपालाने मागाविली असुन सी. सी. टी. व्ही. फुटेज पोस्टाने पाठविणे योग्य नसल्याने पोलीस स्टेशन मध्ये उपस्थित राहुन सीसीटीव्ही फुटेज घेवुन जाणे विषयी अपिलार्थी यांना दि. १०.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. मात्र अपिलार्थी यांनी कार्यालयात उपस्थित न होता प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. सदर प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी त्यांना माहिती प्राप्त झालेली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत त्यांना माहितीची आवश्यकता असल्यास जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहावे. त्यानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सेवली ता. जि. जालना यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलात दिलेल्या आदेशानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२७२/२०२४ 6168 दि. 18/6/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.

पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५९ | द्वितीय अपील क्रं. ५४९/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मिलिंद दिनकर वाहुळे<br>रा. प्लॉट नं. १९/२० सुभेदार रामजी नगर मिसारवाडी,<br>छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>वाचक पोलीस उप निरीक्षक,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उपविभाग अंबड जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभाग अंबड जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी (प्रतिनिधी) व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २४.१०.२०२३ | उप विभागीय पोलीस अधिकारी अंबड यांच्या दैनंदिनी व त्यांनी वापरलेल्या शासकीय वाहनाचे लॉगबुक |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १९.१२.२०२३ रोजी उत्तर देऊन दैनंदिनी नाकारली असुन वाहनाचे लॉगबुक हस्तगत करावी असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. १५.१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे अपील अंशत: मान्य करुन वाहनाचे लॉगबुक अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देणे बाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देश देऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वाचक पोलस उप निरीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उपविभाग अंबड जि. जालना यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.१.२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./५४९/२०२४ 6109 दि. 16/6/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६० व ६१ | द्वितीय अपील क्रं. ८५७ व ७९१७/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मधुसूदन पिराजी शिलवंत<br>रा. बाळकृष्ण सदन पंडलीक नगर वार्ड नं. ६ चिखली जि. बुलढाणा | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय भोकरदन जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १६.११.२०२३ | श्री. येवले यांनी माझेकडुन जबाब लिहुन घेतला त्या जबाबाची प्रत |
| १५.५.२०२४ | सीआरपी १४९ प्रमाणे सारखीच नोटीस ज्या शासन निर्णयानुसार दिली गेली आहे त्या शासन निर्णयाची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अनुक्रमे दि. ०५.१२.२०२३, ११.६.२०२४ रोजी उत्तर देऊन माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. १७.१.२०२४ व दि. ९.७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना पुनश्च माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिले आहेत. त्यानुसार अनुक्रमे १९.१.२०२४ व १३.७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना पुनश्च उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणी वेळी झालेल्या युक्तीवादावरुन व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दोन वेळेस माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

[signature]

**( प्रकाश इंदलकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८५७/२०२४ 6110 दि. 16/6/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६२ | द्वितीय अपील क्रं. ११९१/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सदानंद अर्जुनराव वाघमारे<br>रा. मु. पो. हिवरखेड पुर्णा ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,<br>पोलीस ठाणे तालुका जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १८.९.२०२३ | दि. ७.८.२०२३ व २४.८.२०२३ ला दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २८.१०.२०२३ रोजी उत्तर देऊन गुन्हयाचा तपास चलु असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. २९.११.२०२३ रोजी सुनावणी घेऊन देय असलेली संपुर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी निर्देश दिले आहे. आजरोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांना माहिती प्राप्त झाली आहे किंवा कसे याबाबत खात्री करता आलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे तालुका जालना यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९.११.२०२३ रोजी प्रथम

अपिलात दिलेल्या आदेशानुसार व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./११९१/२०२४ 6112 दि. 16/6/2025

<u>प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता</u>

पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६६ | द्वितीय अपील क्रं. ४५४५/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | डॉ. नरेंद्र जयसिंग गोयल<br>रा. प्लॉट नं. ९०२ टॉवर नं. ५३ फयुचर टॉवर्स अमनोरा पार्क टाऊन पुणे- ४११०२८ | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा समादेशक सहायक,<br>राज्य राखीव पोलीस बल गट क्रं. ३ जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा समादेशक,<br>राज्य राखीव पोलीस बल गट क्रं. ३ जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २९.४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २८.९.२०२३ | आमच्या वेतनातुन आयकर कपात करुन आयकर विभागास भरणा केल्याची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.१०.२०२३ रोजी उत्तर देऊन अपिलार्थी यांच्या वेतनातुन आयकर कपात केले बाबत नोंदी दिसून आल्या आहेत. परंतू सदर रक्कम आयकर विभागास भरणा केली किंवा नाही याबाबत नोंद दिसुन येत नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. १३.२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी सुनावणी वेळी अपिलार्थी यांनी समोदशक कार्यालयातर्फे आयकराची रक्कम त्रैमासीक आयकर परताव्या सोबत जमा केलेल्याच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा समादेशक सहायक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रं. ३ जालना यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयात पुनश्च शोध घ्यावा व या कार्यवाही दरम्यान उपलब्ध झालेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्रं. ३ जालना यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४५४५/२०२४/6113 दि. 16/6/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६७ | द्वितीय अपील क्रं. ४६२६/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. केवलचंद हिरालाल कुचेरीया रा. शिवाजी पुतळयाच्या पाठीमागे सुभाष शिंदे यांचा वाडा इंदेवाडी ता. जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे तालुका जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २९.९.२०२३ | केलेल्या कार्यवाहीची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ३०.१०.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४६२६/२०२४ 6114 दि. 16/6/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ६८ ते ७० | द्वितीय अपील क्रं. ६७६४ ते ६७६६/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सैय्यद मोबिन उद्दीन सैय्यद अल्लाउद्दीन<br>रा. घर क्रं. १-१२-७२ जुना बाजार छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक<br>पोलीस ठाणे जाफ्राबाद जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>उप विभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय भोकरदन जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक २४.६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये ०३ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १८.४.२०२४ | मी दि. ५.३.२०२४ रोजी केलेली तक्रारीवर केलेली कार्यवाही |
| १८.४.२०२४ | मी दि. ५.३.२०२४ रोजी केलेली तक्रारीवर केलेली कार्यवाही |
| २१.३.२०२४ | माझा अर्ज दि. २४.१.२०२४ नुसार माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असुन आता यासंदर्भात कोणतीही तक्रार नसल्याने विचाराधीन अपील निकाली काढाण्यात यावे ही विनंती.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद विचारात घेता उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०३ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६७६४/२०२४ 6115 दि. 16/6/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७१ | द्वितीय अपील क्रं. ८१७५/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सैय्यद मोबिन उद्दीन सैय्यद अल्लाउद्दीन<br>रा. घर क्रं. १-१२-७२ जुना बाजार छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक<br>पोलीस ठाणे टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, भोकरदन जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २२.६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १५.५.२०२४ | कै. मारोतराव देशमुख विद्यालय टेंभुर्णी यांचे घटनास्थळ पंचनाम्याच्या कागदपत्राची व संचिका |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना दिनांक १२.६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती व माहिती संदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नसल्याचे आयोगास अवगत केले असल्याने आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च माहिती दिली आहे. अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सही) प्रकाश

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८१७५/२०२४ 6116 दि. 16/6/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७२ | द्वितीय अपील क्रं. ७५८२/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रकाश कदमऋषी व्यास<br>रा. जवाहरबाग पोलीस चौकी समोर ता. जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन सदर बाजार जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक १६.६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २२.३.२०२४ | श्री. गांवडे स्वच्छता निरीक्षक यांच्या फिर्यादीवर झालेल्या कार्यवाही बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दिनांक २८.३.२०२४ रोजी प्रतिसाद देऊन कलम ८ (ज) नुसार अपिलार्थीस माहिती नाकारण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणी करिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी दि. ३०.५.२०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे मागणी केलेली माहिती आता त्यांना उपयुक्त नाही असे कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिलेला प्रतिसाद व अपिलार्थी यांचे दि. ३०.५.२०२५ रोजीचे निवेदन विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( प्रकाश इंदलकर )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७५८२/२०२४ 6117 दि. 16/6/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७३ | द्वितीय अपील क्रं. १०५७४/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विष्णु रावसाहेब गवळी,<br>रा. रमाबाईनगर ता. जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप-अधिक्षक गृह<br>पोलीस अधिक्षक कार्यालय, जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधिक्षक गृह<br>पोलीस अधिक्षक कार्यालय, जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक ०२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २१.८.२०२४ | श्री. लहु घोरपडे शिपाई यांची टि. सी, जातीचा दाखला व जातप्रमाणपत्र कागदपत्रे मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २४.१०.२०२४ रोजी उत्तर देऊन मागणी केलेली माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने अपिलार्थी यांना माहिती नाकरण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणीच्यावेळी झालेला युक्तीवाद व आयोगासमोर असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भातील वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली आहे. मागितलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नसल्यामूळे अशी माहिती, माहिती अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (ञ) व शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७.१०.२०१४ विचारात घेता, माहिती देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०५७४/२०२४ 6118 दि. 16/6/2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७४ | द्वितीय अपील क्रं. १०५९८/२०२४ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दिपक अशोक सातपुते<br>रा. भवानी नगर जुना जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,<br>पोलीस ठाणे कदिम जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने श्री. डी. एस. मोरे, पोलीस उपनिरीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०३.९.२०२४ | २०१९ ते २०२४ पोलीस ठाणे कदीम जालना व आरोपी कार्यवाही पत्र प्रस्ताव माहिती मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर व प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, याप्रकरणी श्रीमती सुरेखा दिपक सातपुते यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे जोडपत्र-अ नुसार माहिती अर्ज सादर केलेला असुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील व आयोगाकडे द्वितीय अपील हे श्री. दिपक अशोक सातपुते यांनी सादर केलेले आहेत.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार भारतातील प्रत्येक नागरिकाला माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. त्यानुसार ज्या व्यक्तीस माहितीची आवश्यकता आहे. तो प्रत्येक व्यक्ती माहिती अधिकारा अंतर्गत माहितीची मागणी करु शकतो. मात्र ज्या व्यक्तीने माहितीचा अर्ज सादर केलेला आहे त्याच व्यक्तीने पुढील प्रथम व द्वितीय अपील दाखल करणे अभिप्रेत आहे. याप्रकरणी वेगवेगळया व्यक्तीने माहिती व प्रथम अपील, द्वितीय अपील अर्ज दाखल केलेले आहेत. या पार्श्वभुमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०५९८/२०२४ 6119 दि. 9/6/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

---

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| **बोर्ड क्रं. ७५** | **द्वितीय अपील क्रं. १०७९९/२०२४** |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती रोजमेरी खत्री रा. द्वारा मोनिका मिंज कल्पना लॉजजवळ संतोषी माता वॉर्ड बल्लारपूर जि. चंद्रपुर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे चंदनझिरा, ता. जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )**

कक्ष अधिकारी,राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांनी दि.०४.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपील राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे हस्तांतरीत केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी(प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे मा. प्रथमवर्ग न्यायालय बल्लापुर यांनी दि. १५.२.२०२४ रोजी काढलेले वारंट किती तारखेला प्राप्त झाले इत्यादी संदर्भात माहिती मागविलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १७.१०.२०२४ रोजी उत्तर देऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. १९.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.१९.१०.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
**( प्रकाश इंदलकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१०७९९/२०२४ 6118 दि. 16/6/25
6120

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७६ | द्वितीय अपील क्रं. २३०३/२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रामकिसन मुरलीधर गवारे,<br>रा. निकळक ता. बदनापुर जि. जालना | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,<br>जिल्हा व सत्र न्यायालय जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१,<br>जिल्हा व सत्र न्यायालय जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २६.३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २२.१२.२०२३ | प्रकरण क्रं. आर. सी. एस. ५६/२०१२ संपुर्ण संचिका |

आज रोजी सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २२.१२.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना कळविली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. १५.२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजुर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहितीचा अधिकार नियम २००९ मधील तरतुदी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. २१.२.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२३०३/२०२४ 621 दि. 16/6/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७७ व ७८ | द्वितीय अपील क्रं. ६५०१ व ६५०२/२०२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल<br>रा. प्लॉट नं. ए-५१ नाथनगर, सिंधी कॉलनी मागे,<br>छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १. | जन माहिती अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय घनसावंगी जि. जालना | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय, घनसावंगी जि. जालना | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०५.०६.२०२५ )

अपिलार्थी यांनी दिनांक २१.६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०५.२.२०२४ | रोहयो कामाची माहिती मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे माहिती व प्रथम अपिल अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कोणतीही कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत. याबाबीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना अनुक्रमे कलम ७(१) व कलम १९(६) च्या भंगास जबाबदार धरण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मोठया कालावधीची व विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहितीचे अधिनियमाचे कलम २(J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय घनसावंगी जि. जालना यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० (प्रति माहिती अर्ज) पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय घनसावंगी जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर विहीत मुदतीत अपेक्षित कार्यवाही केलेली नसल्याने अधिनियमातील कलम १९(६) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केंमाअज-२००७/७४/प्र.क्र.-१५४/०७/०६,दि.३१.०३.२००८ नुसार कार्यवाही अनुसरावी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थितीत असल्याने त्यांचे विरुध्द सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करावी.

६. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६५०१ व ६५०२/२०२१ 6/22 दि. 16/6/2025

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना